खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०५ | अंक : १७३, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०४ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# उपमुख्यमंत्रीपदानंतर आता सुनेत्रा पवार यांच्यावर आणखी महत्त्वाची जबाबदारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, बीड :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक आणि दुर्दैवी निधनानंतर रिक्त झालेल्या पदांवर अखेर राज्य सरकारने महत्त्वाच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. अजित पवार यांच्या निधनमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी त्यांच्या पत्नी, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. त्यानंतर आता त्यांच्याकडे पुणे आणि बीड या दोन अत्यंत म हत्त्वाच्या जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. राज्य सरकारकडून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबईवरून बारामतीकडे विमानाने प्रवास करत असताना एका भीषण अपघातात अजित पवार यांचे निधन झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. त्यांच्या निधननंतर राज्याच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली होती. मात्र, प्रशासकीय आणि राजकीय स्थैर्य राखण्यासाठी राज्य सरकारने तातडीने निर्णय घेत सुनेत्रा पवार यांना मंत्रिमंडळात स्थान दिले. सुनेत्रा पवार यांच्यावर आता मोठी



जाबबादीर आहे. पुणे आणि बीड हे दोन्ही जिल्हे महत्त्वाच्या जिल्ह्यांपैकी एक आहेत. त्यामुळे या जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी कुणाला मिळेल? याकडे सर्वांचं लक्ष होतं.

**पालकमंत्री पदाचा सस्पेन्स संपला**

अजित पवार हे पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून सक्रिय होते, तर बीड जिल्ह्याच्या राजकारणातही त्यांचा मोठा प्रभाव होता. त्यांच्या निधननंतर हे दोन्ही जिल्हे कोणाकडे जाणार? याबाबत राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात होते. अखेर राज्य सरकारने एक अधिकृत परिपत्रक जारी करून या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे. सुनेत्रा पवार आता पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांच्या विकासाची आणि प्रशासनाची सूत्रे हाती घेणार आहेत.

**आव्हाने आणि जबाबदारी**

सुनेत्रा पवार यांच्यासमोर आता अजित पवारांचा वारसा पुढे नेण्याचे मोठे आव्हान आहे. पुण्याचा विस्तार आणि बीडमधील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांना प्रशासकीय कसब वापरावे लागणार आहे. एकाच वेळी दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांची जबाबदारी मिळाल्याने त्यांच्या राजकीय कारकीर्दीतील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

# चंद्रपूर शहरात ऐतिहासिक राष्ट्रीय एकात्मता दौड !

## गांधी चौक ते जटपूरा गेट पर्यंतचा परिसर देशभक्तीपर वातावरणाने दुमदुमला

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** गांधी चौक ते जटपूरा गेट पर्यंत पार पडलेली राष्ट्रीय एकात्मता दौड सोमवार दि. ०२ फ ेब्रुवारी २०२६ ला शहरात ऐतिहासिक ठरली. या दौडमध्ये हजारोच्या संख्येने दिव्यांग, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, युवक, विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी विभागातील पदाधिकारी, वकील, डॉक्टर, अभियंता, प्राध्यापक, शिक्षक, पोलीस, आदी म ोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



या दौडचे एक टोक जटपूरा गेट तर दुसरे टोक गांधी चौक असे दिसत होते. चंद्रपूर शहरातील सर्व शैक्षणिक संस्था, महाविद्यालयॅ प्राचार्य मिळून राष्ट्रीय एकात्मता दौड चे स्थानिक गांधी चौक ते जटपूरा गेट पर्यंत आयोजन करण्यात आले होते.

सरदार वल्लभभाई पटेल, जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीला १५० वर्षे व वंदे मातरम गीतरचनेला १५० वर्षे झाल्याच्या निमित्ताने या राष्ट्रीय एकात्मता व स्वातंत्र्य चेतना महोत्सव २०२६ चे आयोजन शहरात सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रीय एकात्म ता दौड चे आयोजन करण्यात आले होते. या दौडकरीता रस्ते रांगोळींनी सुशोभीत करण्यात आली होती. स्वागत गेट लागले होते. रस्त्याच्या दुतर्फा लोहपुरुष सरदार वल्लभभाईजी पटेल व जननायक बिरसाजी मुंडा व वंदे मातरम कट आउट लागले होते. राष्ट्रभक्तीपर गीते वाजत होते. जटपूरा गेटच्या आतील परिसर नियोजनबध्दरित्या देशभक्तीपर वातावरणाने सजला होता. सकाळी ८ वाजता गांधी चौकात पांढऱ्या वेशात शहरवासी एकत्रित झाले. दौडच्या सुरुवातीला दिव्यांग, त्यानंतर शाळकरी मुले, महाविद्यालयीन मुले, ज्येष्ठ नागरिक, शहरातील प्रोफ ेशनल्स, व्यावसायिक, तरुण या प्रकारे रांगा लावून गांधी चौकाकजे अग्रेसित झाले. 'भारत माता की जय', 'वंदे म ातरम' आदी जयघोष सुरु होते. जटपूरा गेटवर सहभागींकरीता गोळ्या,बिस्कीट व पाण्याची व्यवस्था होती. दरम्यान राष्ट्रसेवा प्रतिज्ञा घेण्यात आली. गांधी चौक ते जटपूरा गेट परिसर देशभक्तीपर वातावरणाने दुमदुमला होता.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ.राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत एसएस २/ बी २२९, सेक्टर ०२, ऐरोली, नवी मुंबई येथे बबन बाबू पवार, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट) यांनी तसेच एसएस २/ बी २३०, सेक्टर ०२, ऐरोली, नवी मुंबई येथे प्रेमानंद प्रजापती, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट) यांनी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

बबन बाबू पवार, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट), एसएस २/ बी २२९, सेक्टर ०२, ऐरोली, नवी मुंबई व प्रेमानंद प्रजापती, गुफरान खान (ठेकेदार), ओमकार निर्गुडे (आर्किटेक्ट), तसेच एसएस २/ बी-२३०, सेक्टर ०२, ऐरोली, नवी मुंबई यांच्या अनधिकृत बांधकामांस जी विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदर अनधिकृत बांधकाम नैनेश एस. बदले, सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशत: निष्कासित करण्यात आले. तसेच अनधिकृत बांधकाम हटविण्याचे दंडात्मक शुल्क प्रती रु. ५,०००/- प्रमाणे एकूण रु.१०,०००/- वसूल करण्यात आले. सदर धडक मोहिमेसाठी जी-विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी, मजूर, ब्रेकर, गॅसकटर, घण तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. या पुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# कोयना धरणातील बंद पाडलेले बोटींग पुन्हा सुरू करणार - वनमंत्री नाईक

## वनविभागाकडून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविणार...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०३, पाटण :** पाटण तालुका वनक्षेत्राशी निगडित आहे. यामुळे येथे शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत. पाटण तालुक्यातील मंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचा कधीही प्रयत्न वनविभागाकडे केला नाही. मात्र यापुढे पाटण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कोणत्याही समस्या आमच्याकडे राहणार नाहीत. वन्य प्राण्यांकडून हल्ल्यात जखमी झालेल्या शेतकऱ्यांना व त्यांच्या नुकसानीला जास्तीत जास्त मदत देवू. कोयनेतील बंद पडलेले बोटींग जलसंपदा मंत्र्यांच्या सहकार्याने पुन्हा चालू करु आणि कोयनेचे गेलेले पर्यटन वैभव पुन्हा मिळवून देवू. असे आश्वासन राज्याचे वनमंत्री ना.गणेश नाईक यांनी कोयना येथे झालेल्या सभेत बोलताना दिले.



गोकुळ तर्फ हेळवाक (कोयना) गटातील जिल्हा परिषदेचे भाजपा उम ेदवार दत्तात्रय (बाळासाहेब) कदम व गणातील उमेदवार सौ. वैशाली बबन कांबळे यांच्या प्रचारार्थ कोयना येथे आले असता ना. गणेश नाईक बोलत होते. ते पुढे म्हणाले पाटणचे माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर हे सज्जन व्यक्ती आहेत. त्यांचे आणि माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. आता तेही भाजप मधे आहेत. त्यामुळे आमचे जिव्हाळ्याचे संबंध आणखी दढ झाले आहेत. यामुळे पाटण तालुक्याचा पालकमंत्री मी आहे. येथे कशाचीही कमतरता पडू दिली जाणार नाही.

पाटण तालुक्यात सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोयना अभयारण्य, इको सेन्सिटिव्ह झोन, कँझुरवेश्वन झोन आदींमुळे आलेल्या समस्या सोडविण्यासाठी संबंधित मंत्र्यांसोबत बैठक लाऊन हे प्रश्न मार्गी लावणार. असे सांगताना ना. गणेश नाईक पुढे म्हणाले येथे पालकमंत्री नाही तर म ालकमंत्री झालेत या मालकमंत्र्यांची दहशत येथे वाढली आहे. अशा दहशीतींना गणेश नाईक घाबरत नाही. मी ही उत्पादन शुल्क खात्याचा दहा वर्षे मंत्री होतो. पण कोणाचा हरामचा पैसा घेतला नाही. येथे मागच्या पाच वर्षांत काय दिवे लावले ते येथील जनतेला माहिती आहे. पाटणची जनता स्वाभिमानी आहे. आता येथून पुढे पाटणच्या जनतेसोबत हा गणेश नाईक आहे. असे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले ना. गणेश नाईक साहेबांचे आणि दादांचे जुणे सबंध आहेत. यामुळे नाईक साहेबांना पाटणच्या जनतेविषयी विशेष प्रेम आहे. कोयना भागात अनेक समस्या आहेत. या समस्या सोडविण्याचा गेल्या दहा वर्षांत कधीही प्रयत्न झाला नाही. उलट समस्या वाढवून ठेवल्या अशी येथील कर्तबगारी आहे. सत्तेत नसतानाही आम्ही लोकांच्या मदतीसाठी धावलो वेळोवेळी लोकांना न्याय मिळवून दिला. नैसर्गिक आपत्तीवेळी लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्या अगोदर पोहचून लोकांना मदत केली. गेल्या पंधरा वर्षांत कोयनेच्या पर्याटनाला खिळ बसली आहेत, कोयनेच्या पर्यटनाला पुन्हा सोन्याचे दिवस आणायचे असतील तर आपल्या भाजपच्या उम ेदवारांना निवडून दिले पाहिजे. तुम्ही ताकद द्या आपण विकासकामे खेचून आणू असे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी माजी सभापती राजाभाऊ शेलार, जि.प.चे उमेदवार दत्तात्रय (बाळासाहेब) कदम, प.स. उमेदवार सौ.वैशाली कांबळे, नंदकुमार सुर्वे, बबन कांबळे, सचिन कदम, पंकज गुरव, बंटी शेलार यांची भाषणे झाली. यावेळी कोयना विभागातील म हिला, ग्रामस्थ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुल्या राष्ट्रीय तायक्वान्दो स्पर्धेत मंद्रूपच्या खेळाडूंना २५ पदके

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०३, सोलापूर :** पुणे येथे झालेल्या चौथ्या खुल्या राष्ट्रीय तायक्वान्दो स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्वान्दो अकॅडमी मंद्रपच्या २५ खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. यामध्ये ९ सुवर्ण, ८रौप्य व ८ कांस्यपदक पदंकांचा समावेश आहे.




वडगाव शेरी (पुणे) येथे नुकत्याच या स्पर्धा झाल्या. आर. बी. होरांगी अकॅडमी पुणे यांनी या खुल्या राष्ट्रीय तायक्वान्दो स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये दक्षिण सोलापूर तायक्वान्दो अकॅडमी मंद्रूप च्या खेळाडूंनी

सहभागी होत विविध गटातून २५ पदके जिंकली. यामध्ये अमन शेख, दिव्या पवार, अनव्वी पवार, आरोही रणखाबे, आरोही कंदले, सफिना शेख, शुभम पवार, तनिष्का पवार, व महेक शेख यांनी सुवर्णपदक

श्रेया पवार, श्रावणी नंदुरे, श्रावणी पवार, अभिजीत खरात, अर्थव शिंगडगाव, प्रतिक्षा देविदास, हर्ष सरवदे, समर्थ चव्हाण यांनी रौप्यपदक मिळविले. तर सुमया शेख, प्रेम चव्हाण, कार्तिक परांडे, श्रद्धा सोलापूरे, आयुब शेख, दीक्षा हेळकर, अबूबकर नदाफ व रविराज कुसुरे यांनी कांस्यपदक पटकावले आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तमिळनाडू व इतर राज्यांतील खेळाडूंनी भाग घेतला होता.

या सर्व यशस्वी खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशावद्दल सर्व खेळाडूंचे दक्षिण सोलापूर तायक्वांडो अकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण जोडमोटे, रेश्मा राठोड, सचिन कुंभार, सिध्दाराम विजापुरे, प्रीती राठोड यांनी अभिनंदन केले.

# देशी गायींच्या उत्पादनांपासून औषधनिर्मिती करणारे डॉ.रवींद्र प्रभुदेसाई

**'बायको गेली माहेरी, काम करी पितांबरी'**

ही टॅगलाईन घेऊन तांब्या पितळेची भांडी लखलखीत करणारी पितांबरी शायनिंग पावडर घेऊन बाजारात उतरणारी पितांबरी आज भारतभरात घरोघरी पोहोचली आहे. अमेरिका, कॅनडा, ब्राझील, रशिया आणि ऑस्ट्रेलियासह २६ हुन अधिक देशांत कंपनीची उत्पादने पोहचली आहेत. नऊ डिव्हिजन्समध्ये ८२ हुन अधिक दर्जेदार उत्पादने कंपनीने बाजारात आणली आहेत. या पितांबरीचा डोलारा उभा करणारे आणि तितक्याच ताकदीने तो पेलणारे पितांबरीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांची उद्योगक्षेत्रातील भरीव कामगिरी आणि ते करत असलेल्या सामाजिक कार्याची दाखल घेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांना सन्माननीय डी.लिट.(विद्यानिधी) पदवी प्रदान करण्यात आली. पितांबरीने हेल्थ केअर डिव्हिजनच्या अंतर्गत संशोधन करून अनेक आयुर्वेदिक औषधे बाजारात आणली आहेत. रवींद्र प्रभुदेसाई लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत वाढलेले असल्याने आणि पुढे सनातन संस्थेशी त्यांचा जवळून संपर्क आल्याने त्यांना गोमातेविषयी प्रचंड प्रेम, आदर आणि आस्था आहे. हिंदू धर्मात गाईला पूजनीय मानले जाते. कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते. गाईंचा वावर ज्या ठिकाणी असतो त्या स्थानातील नकारात्मक स्पंदने नष्ट होऊन सकारात्मकता वाढते हे आधुनिक शास्त्रज्ञांनी प्रयोगातून सिद्ध केले आहे. वास्तुदोष जलदगतीने दूर करण्याचे सामर्थ्य गाईंमध्ये असते. गाईंचे महत्व लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्याने देशी गाईला राज्यमातेचा दर्जा दिला आहे. देशी गाईंचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन प्रभुदेसाई यांनी आपल्या आनगाव येथील फार्ममध्ये तसेच तळवडे येथील त्यांच्या गावी देशी गाईंसाठी गोशाळा उभारल्या.



देशी गाईचे गोमूत्र हे ३६ प्रकारच्या विविध आजारांवर गुणकारक असल्याचा उल्लेख आयुर्वेदातील चरक, सुश्रुत आणि वागभट या ग्रंथांत आढळतो. सनातनच्या आश्रमात वास्तव्यास असलेले संत परमपूज्य पांडे महाराज यांनी प्रभुदेसाई यांना प्रतिदिन गोमूत्र पिण्याचा सल्ला दिला; मात्र गोमुत्राचा उग्र वास आणि चव यांमुळे ते सर्वांनाच पिता येणे शक्य नाही हे प्रभुदेसाई यांच्या लक्षात आले. गोमूत्राचे आश्चर्यकारक लाभ लक्षात घेता ते अधिकाधिक लोकांच्या पोटात जायला हवे हा ध्यास त्यांना स्वस्थ बसू देईना. रवींद्र प्रभुदेसाई यांनी कंपनीच्या रिसर्च अँड डेव्हलपमेन्ट सेंटरला गोमूत्रावर संशोधन करून लिक्विड फॉर्ममधील गोमूत्र 'पावडर फॉर्म'मध्ये करता येईल का याविषयी माहिती मिळवून संशोधन करण्यास सांगितले. गोअर्क तयार करताना गोमूत्र तीव्र तापमानावर गरम करावे लागते ज्यामुळे त्यातील बरेच गुणधर्म नाहीसे होतात, मात्र गोमूत्र 'पावडर फॉर्म'मध्ये करताना हे गुणधर्म कमी होता कामा नये याकडे त्यांचा विशेष कटाक्ष होता. प्रभुदेसाई यांची तळमळ आणि आर अँड डी टीममधील तज्ञ आणि अनुभवी मंडळींच्या अथक परिश्रमातून गोमुत्राची पावडर तयार करण्यात यश आले. त्यामध्ये त्रिफळा चूर्ण मिश्र करून त्यापासून गोमूत्र प्लस कॅप्सूल तयार करण्यात आल्या. गोमूत्र प्लसच्या एका गोळीमध्ये पाव वाटी गोमूत्राचे गुणधर्म आहेत. सध्याच्या बदलत्या राहणीमानांत अनेकदा जंकफूड, मैद्याचे पदार्थ आहारात येत असतात ज्यामुळे अनेकांमध्ये बद्धकोष्ठतेचा त्रास निर्माण होतो. हा त्रास दूर करून शरीराला नको असलेल्या गोष्टी बाहेर टाकून देण्याचे महत्वाचे कार्य गोमूत्र प्लस कॅप्सूल करते. रक्त वाहिन्यातील वाढलेले कोलेस्ट्रॉईल काढून ते नियंत्रित करणे, मधुमेहामुळे होणारे साईड इफेक्ट्स नियंत्रित करणे, तसेच अतिरिक्त चरबी घटवण्याचे काम गोमूत्र प्लस कॅप्सूल करते. यकृताच्या विकारांवरही गोमूत्र प्लस अत्यंत गुणकारी आहे. अशा एकनाविध अनेक आजारांवर गुणकारी असलेले पितांबरीचे अभिनव संशोधन असलेल्या गोमूत्र प्लस कॅप्सूलला समाजात मोठी मागणी आहे. गोमूत्रापासून आयुर्वेदिक कॅप्सूल बनवणारी पितांबरी ही भारतातील पहिली कंपनी आहे. गायीचे महत्त्व ओळखून 'पितांबरी'ने संशोधन करून आणखीही अनेक 'गो-उत्पादने' आणली आहेत. गायीपासून मिळणार्या विविध उत्पादनांपासून 'पितांबरी गोमूत्र कॅप्सूल', 'पितांबरी गोमय शेणखत', तसेच 'गोपीयुष', 'पितांबरी रुचियाना खरवस (गाय वेल्यानंतर मिळणार्या चिकापासून खरवस)' हे रोगप्रतिकारशक्ती वाढवणारे अमूल्य घटक आहेत. 'गोपीयुष'मधील 'नॉन केसिन प्रोटीन'मुळे 'इम्युनोग्लोब्युलिन्स' (शरिराची रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करणारी आणि संसर्गाशी लढणारी प्रतिपिंडे) सिद्ध होतात, पांढर्या पेशी अन् 'टी-सेल्स' (शरिरातील पांढर्या रक्तपेशींचा एक प्रकार) सक्षम होतात अन् शरीर आजारांशी लढण्याची शक्ती मिळवते.

गोसेवा, समाजसेवेचा आणि देशभक्तीचा वारसा श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांच्याकडे त्यांच्या वडिलांकडूनच आला आहे. लहानपणापासून राष्टीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत त्यांचे जाणे असल्याने समाजसेवेचे आणि देशसेवेचे बालकडू त्यांना लहानपणीच मिळाले आहे. समाज ऋण फेडण्याच्या दृष्टीने ते विविध सामाजिक संस्था, राष्ट्र आणि धर्म यांच्या पुनरुत्थानासाठी झटणाऱ्या संघटना, उदयोन्मुख कलाकार, गरजू व्यक्ती, गतिमंद मुले यांना नियमितपणे दान देत असतात. मग ते दान पैशाच्या स्वरूपात असो वा पितांबरीच्या गृहोपयोगी उत्पादनांच्या स्वरूपात. विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि लोकोपयोगी कार्यांना प्रायोजकत्व देऊनही ते सामाजिक बांधिलकी जपत असतात. मराठी माणसांनी नोकरीमध्ये अडकून न पडता लहान मोठा व्यवसाय करावा आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी प्रभुदेसाई वेळोवेळी मार्गदर्शन करत असतात. हजारो कर्मचाऱ्यांचे संसार आज त्यांच्यामुळे उभे आहेत. त्या कुटुंबियांचे तसेच सामाजिक कार्यात ते वेळोवेळी करत असलेल्या मदतीमुळे अशा कृतार्थाचे आशीर्वाद आणि शुभेच्छा प्रभुदेसाई यांच्या पाठीशी आहेत.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# फेसबुकचा वाढदिवस!

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २२ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज फेसबुकचा बाविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या तीनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्रयूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली.

४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २२ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास पंधरा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला. मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुकने आता वापरकर्त्यांसाठी ए आय ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे वापरकर्ते ए आय च्या मदतीने आपल्याला हवी ती माहिती क्षणार्धात मिळवू शकतात. तसेच ए आय चा वापर करून आपले फोटो, व्हिडिओ, रिल्स, व्हिडिओ शेअर करू शकतात. फेसबुकवर दररोज अब्जावधी फोटो, व्हिडिओ आणि रिल्स शेअर केले जातात. तसेच फेसबुकवर दररोज अब्जावधी पोस्टचा पाऊस पडतो. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. आज इंस्टाग्रामवर अधिक वेळ घालवत असली तरी फेसबुक ही त्यांना तितकेच प्रिय आहे. फेसबुकवर सर्वच वयोगटातील लोकांचे अकाऊंट आहे. प्रत्येकाला फेसबुक जवळचा वाटतो. फेसबुक नंतर अनेक सोशल नेटवर्किंग साईट आल्या पण फेसबुकने आपला दर्जा कायम ठेवला त्यामुळेच २२ वर्ष होऊनही फेसबुकची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. सर्वांच्या लाडक्या फेसबुकला २२ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**

# माणसे जपायची असतात पण आपण माणसांनाच वापरतोय!

माणसे जपायची असतात आणि पैसा वापरायचा असतो; पण आज लोक पैसा जपतात आणि माणसे वापरतात. हे वाक्य केवळ तात्त्विक नाही, तर आजच्या समाजाचे अचूक एक्स-रे आहे. या एका ओळीत आपल्या सामाजिक अधःपतनाची, नात्यांच्या विघटनाची आणि मूल्यांच्या घसरणीची संपूर्ण कहाणी सामावलेली आहे. दुर्दैव इतकेच की, हे सत्य आपल्याला माहिती असूनही आपण त्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहोत. आजचा काळ हा केवळ आर्थिक स्पर्धेचा नाही, तर मानवी मूल्यांवर चाललेल्या अदृश्य युद्धाचा काळ आहे. या युद्धात पैसा जिंकतो आहे आणि माणूस हरतो आहे. पैसा कधीच वाईट नव्हता. तो माणसाच्या गरजांसाठी निर्माण झालेला एक साधन होता पण साधन हळूहळू साध्य बनू लागले आणि साध्य असलेला माणूस उपयुक्ततेच्या निकषांवर तोलला जाऊ लागला. आज माणसाची किंमत त्याच्या संवेदनशीलतेवर नाही, तर त्याच्या आर्थिक क्षमतेवर ठरते. आज समाजात विचारले जाणारे प्रश्न बदलेले आहेत. तू कसा आहेस? यापेक्षा तू काय करतोस? किती कमावतोस? तुझा स्टेटस काय? हे प्रश्न महत्त्वाचे ठरले आहेत. या प्रश्नांमागे माणसाविषयीची आपुलकी नाही, तर त्याच्या उपयोगितेची चाचपणी आहे.

पूर्वी नाती भावनेवर उभी राहायची. आज ती व्यवहारावर टिकतात. आज प्रत्येक नात्यामागे एक अदृश्य अट असते जोपर्यंत उपयोग, तोपर्यंत संबंध. मित्र तेव्हाच जवळचा, जोपर्यंत तो कामाचा आहे. नातेवाईक तेव्हाच आपले, जोपर्यंत त्यांच्याकडून काही मिळणार आहे. कार्यकर्ता तोपर्यंत महत्त्वाचा, जोपर्यंत तो मतांमध्ये रूपांतरित होतो. कर्मचारी तोपर्यंत हवासा, जोपर्यंत तो 'प्रॉफिटेबल' आहे. आज माणूस माणूस म्हणून स्वीकारला जात नाही; तो गुंतवणूक म्हणून पाहिला जातो. जिथे 'रिटर्न' नाही, तिथे संबंध संपवायला कोणालाही अपराधीपणा वाटत नाही. ही मानसिकता केवळ अमानवी नाही, तर समाजघातकी आहे. महानगरे विस्तारत आहेत. उंच इमारती उभ्या राहत आहेत. स्मार्ट सिटी, स्मार्ट रोड, स्मार्ट लाईफ सगळं काही 'स्मार्ट' होत आहे. पण या स्मार्टपणात माणूस मात्र एकटा पडतो आहे. एकाच इमारतीत राहणारी माणसं एकमेकांना ओळखत नाहीत.

शेजाऱ्याचा मृत्यू मोबाईल नोटिफिकेशनद्वारे कळतो. दुःखाला वेळ नाही, संवादाला उसंत नाही, माणसाला थांबवायला कोणी नाही. संपर्क वाढले आहेत, पण संवाद संपले आहेत. नेटवर्किंग वाढले आहे, पण नाती तुटली आहेत. कारण वेळ जपायचा असतो माणसांसाठी नाही, तर पैशासाठी. कुटुंब ही माणूस जपण्याची पहिली शाळा असते. पण आज तिथेही व्यवहार शिरकाव करू लागला आहे. वृद्ध आई-वडील जबाबदारी वाटू लागतात. मुलं इन्व्हेस्टमेंट ठरतात. लग्न हे नातं न राहता 'सेटलमेंट' बनते. आज प्रश्न असा उरलेला नाही की आपण कुटुंबासाठी काय करतो, तर प्रश्न आहे, आपल्याला त्यातून काय मिळतं? ज्या दिवशी नात्यांमधून अपेक्षा वाढतात आणि समजूत कमी होते, त्या दिवशी कुटुंब कोसळायला सुरुवात होते.

आजच्या आर्थिक व्यवस्थेत माणूस आकड्यात बदलला आहे. कामगार म्हणजे 'कॉस्ट'. शेतकरी म्हणजे 'डेटा'. रुग्ण म्हणजे 'केस'. विद्यार्थी म्हणजे 'फीस'. माणसाच्या वेदना, त्याचा संघर्ष, त्याची कथा या सगळ्याला व्यवस्थेत स्थान नाही. कारण त्यातून थेट नफा मिळत नाही. आपण विकासाच्या नावाखाली व्यवस्था उभी करतो, पण त्या व्यवस्थेत माणूस बसतच नाही आणि मग प्रश्न पडतो, हा विकास नेमका कोणासाठी? राजकारणात माणूस मतदार असतो. निवडणुकीच्या काळात त्याच्यासाठी घोषणांचा पाऊस पडतो. आश्वासनांची खैरात होते. पण निकाल लागल्यानंतर तो पुन्हा विसरला जातो. लोकप्रतिनिधी जपले जातात, सत्ता जपली जाते, निधी जपला जातो पण माणूस मात्र वापरला जातो. लोकशाहीचा आत्मा माणसात असतो, पण आज लोकशाही केवळ आकड्यांमध्ये उरली आहे. आज वापरणे ही सवय झाली आहे, नात्यांचा वापर, भावनांचा वापर, माणसांचा वापर. जो माणूस प्रश्न विचारतो, तो त्रासदायक ठरतो. जो झुकतो, तो उपयुक्त ठरतो. ही संस्कृती माणसाला गप्प बनवते, संवेदनांना बोथट करते आणि समाजाला निर्दयी बनवते आणि शेवटी, हाच समाज एकाकी, अस्वस्थ आणि हिंसक बनतो. पैसा साठवता येतो, पैसा वारसा देता येतो, पैसा बँकेत सुरक्षित ठेवता येतो, पण माणूस? तो जपला नाही, तर निघून जातो आणि तो गेला, की परत येत नाही.

आयुष्याच्या शेवटी पैसा उपयोगी पडत नाही. तेव्हा आठवण येते ती माणसांची, ज्यांना आपण वेळ दिला नाही, जपलं नाही, समजून घेतलं नाही. वेळ आहे, दिशा बदलण्याची, आजही वेळ गेलेली नाही पण त्यासाठी आत्मपरीक्षण गरजेचं आहे. आपण पैसा जपतोय की माणसं, याचा विचार करायला हवा. पैसा वापरायला शिका शिक्षणासाठी, आरोग्यासाठी, समाजासाठी पण माणसं जपा, कारण समाज माणसांवर उभा असतो, नफ्यावर नाही. जर आपण आजही माणसांपेक्षा पैशाला महत्त्व देत राहिलो, तर उद्या आपल्या भोवती सर्व काही असेल. घर, गाडी, संपत्ती पण कोणीच आपलं नसेल. कारण पैसा साथ देत नाही. तो फक्त साक्षीदार असतो आपल्या अपयशाचा. म्हणून माणसे जपायची असतात कारण शेवटी माणूसच माणसाच्या कामी येतो.

**- प्रविण बागडे, नागपूर**

# महसूल सहाय्यकाला रंगेहाथ पकडले...

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०२, कोपरगाव :** तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक महिलेने शासकीय कामासाठी लाच मागून स्वीकारल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून तिला रंगेहाथ पकडले. श्रीमती अंजना पंडित पवार (वय ३६), महसूल सहाय्यक, वर्ग-३, तहसील कार्यालय कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर असे आरोपीचे नाव आहे. तक्रारदार यांचे नोंद मिळकत वाटप प्रकरणातील काम मंजूर करून देण्यासाठी आरोपी महिलेने ७ हजार रुपयांची लाच मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे तक्रार दाखल केली होती.

तक्रारीच्या अनुषंगाने सोमवार (दि.२ फेब्रुवारी २०२६) रोजी कोपरगाव तहसील कार्यालयात सापळा रचण्यात आला. आरोपी अंजना पवार यांनी ७ हजार रुपयांची लाच स्वीकारताच त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पथकात पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे, पोलीस शिपाई गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक, वैभव बबन सुपेकर तसेच वाहन चालक पोलिस शिपाई हारून शेख यांचा समावेश होता. सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व अपर पोलीस अधीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या प्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी लाच मागत असल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दृष्टी...

धन्यवाद डोळ्यांनो
दिधली मजला दृष्टी
पाहू शके तुम्हां मुळे
रे अतीव सुंदर सृष्टी

अश्रू वाटे व्यक्त करे
मी होता दुःखीकष्टी
बोलू नशके मुख जे
तुम्हीचं दिलीय पुष्टी

कधी रूसून बसला
वृत्ती दाखवतो हट्टी
एका नेत्र कटाक्षात
शत्रुशीही होते गट्टी

मनातले तथ्य वाचा
करु तीक्ष्ण अंतर्दृष्टि
समजू शके निशब्द
आच्छादनकृतगोष्टी

नयनबाणानेघायाळ
प्रेमाची ओथंबे वृष्टी
जुळवली कैकनाती
लाभे हृदयांससंतुष्टी

दृष्ट लावी संबंधाला
माणसे जे आपदृष्टि
विखारीनजरा जाळे
सत्शीलकरे अंत्येष्टी

जगत् जेत्यां दिधले
वरदान असे दूरदृष्टी
डोळ्यां करार साध्य
न साधे आवळू मुष्टी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या गाईंची सुटका; ४.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०३, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी पोलीस स्टेशनच्या पथकाने कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या गाईंची सुटका करत ४ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्याची उल्लेखनीय कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक अहिल्यानगर व अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर यांच्या मार्गदर्शनानुसार पोलिसांकडून पेट्रोलिंग सुरू असताना मंगळवार, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ४.४५ वाजता सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ हे शासकीय वाहनाने रात्रगस्त करत होते. यावेळी रेल्वे स्टेशन रोड, तांदूळवाडी (ता.राहुरी) शिवारात एक संशयित पिकअप वाहन भरधाव वेगाने जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास



आले. पोलिसांनी पाठलाग केल्यानंतर चालक व त्याच्यासोबत असलेला एक इसम वाहन रस्त्यावर सोडून पळून गेले. सदर पिकअप वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये तीन मोठ्या जर्सी गाई व दोन लहान वासरे अशी जनावरे दाटीवाटीने बांधलेली आढळून आली. पोलिसांनी घटनास्थळी पथक बोलावून वाहन व जनावरे राहुरी पोलीस स्टेशन येथे आणली. यामध्ये पाच गाई-वासरे व महिंद्रा पिकअप वाहन असा एकूण ४,३०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी अज्ञात चालकाविरोधात राहुरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर नंबर ११३/२०२६ अन्वये महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर कारवाई माननीय सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर, माननीय सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर, तसेच माननीय जयदत्त भवर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीरामपूर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय आर. ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ, सहायक फौजदार तुळशीदास गिते, पोहेकॉ विजय नवले, पोहेकॉ संदीप ठाणगे, चालक पोहेकॉ शकूर सय्यद, पोकॉ जयदीप बडे व पोकॉ नदीम शेख यांनी सहभाग घेतला.या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक फौजदार तुळशीदास गिते हे करीत आहेत.

# लंके, झावरे, चौधरी यांना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा

## लोकसभा निवडणुकी नंतरच्या वादाचे प्रकरण

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाच्या निकालानंतर उफाळलेल्या राजकीय वैमनस्यातून उभ्या राहिलेल्या एका गंभीर व बहुचर्चित प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करत निर्णय दिला आहे. ही गुन्ह्याची बातमी राज्यभर चर्चेचा विषय ठरली होती. तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात ॲड. राहुल झावरे, खासदार नीलेश लंके यांचे बंधू दीपक लंके व संदीप चौधरी यांना अटक न करण्याचे अंतरिम संरक्षण सर्वोच्च न्यायालयाने दिले.

अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाचा निकाल ४ जून २०२४ रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे उमेदवार नीलेश लंके यांनी भाजपचे सुजय विखे यांचा पराभव करत पहिल्यांदाच खासदारकी मिळवली. या पराभवाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच, ६ जून २०२४ रोजी पारनेर येथील आंबेडकर चौकात ॲड. राहुल झवरे यांना मारहाण करण्यात आली. या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथील सुरभी हॉस्पिटलमध्ये आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. तेथेच त्यांचा जबाब नोंदवून पारनेर पोलीस ठाण्यात माजी नगराध्यक्ष विजय औटी, प्रितेश पनमंद यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात पाच आरोपींना अटक झाली तर बारा आरोपी फरार आहेत. तपास पूर्ण होऊन हे प्रकरण सध्या अहिल्यानगर सत्र न्यायालयात प्रलंबित आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर हर्षदा पानमंद यांनी ७ जून २०२४ रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात स्वतंत्र तक्रार दाखल केली. या तक्रारीत जातीवाचक, शिवीगाळ, विनयभंग, मारहाण व धमकीचे गंभीर आरोप करण्यात आले. त्यावरून २४ जणांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. अहिल्यानगर सत्र न्यायालयाने २२ आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर केला. मात्र ॲड. राहुल झावरे, दिपक लंके व संदीप चौधरी यांचा जामीन नामंजूर झाला. त्यानंतर उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपीलवर दीर्घकाळ अंतरिम संरक्षण मिळाले, परंतु २२ जानेवारी २०२६ रोजी उच्च न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला.

अखेर या तिघांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केली. २ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावत अटक न करण्याचे अंतरिम संरक्षण दिले. विशेष म्हणजे पहिल्या फिर्यादीत ॲड. एस नागमंथू , ॲड. संजय खराडे, ॲड. सुशीलकुमार वर्मा या जेष्ठ वकीलांची उपस्थिती ही बाबही चर्चेचा विषय ठरली. या प्रकरणात बचाव पक्षाच्या वतीने ॲड. गौरव अग्रवाल, ॲड. रवी अडसुरे, ॲड. राहुल करपे, ॲड. यश सोनवणे, ॲड.राहुल जोंधळे, ॲड. विश्वभारती देवखिळे यांनी परिस्थितीकडे लक्ष वेधले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ मार्च रोजी होणार आहे.

# १८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत मुंबई संघाची दिमाखदार कामगिरी



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०३, मुंबई :** तमिळनाडू येथे आयोजित करण्यात आलेल्या १८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय डॉजबॉल अजिंक्यपद स्पर्धेत मुंबई डॉजबॉल संघाने उत्कृष्ट, शिस्तबद्ध व आक्रमक खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक (उपविजेतेपद) पटकावले. ही राष्ट्रीय स्तरावरील मानाची स्पर्धा दि.२८ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. देशभरातील विविध राज्यांचे बलाढ्य अनुभवी संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. मात्र,मुंबई संघाने प्रत्येक सामन्यात वेगवान हालचाली, अचूक डॉज, उत्कृष्ट संघसमन्वय आणि रणनीतीपूर्ण खेळ सादर करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. मुंबई संघाच्या मुलांच्या, मुलींच्या तसेच मिक्स (चळशव) संघाच्या खेळाने प्रेक्षक व क्रीडा तज्ज्ञांची विशेष दाद मिळवली. मुंबई संघाचे प्रशिक्षक विनायक देवकर यांना सुरुवातीपासूनच मुंबई संघ अंतिम फेरीपर्यंत पोहोचेल, असा ठाम विश्वास होता. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा खेळाडूंना मोठ्या प्रमाणात फायदा झाला. योग्य रणनीती, मानसिक तयारी आणि वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंनी आत्मविश्वासाने खेळ सादर केला आणि त्याचाच परिणाम म्हणून मुंबई संघाने द्वितीय क्रमांकापर्यंत मजल मारली. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले स्थानिक आमदार तसेच भारतीय डॉजबॉल महासंघाचे सचिव आदरणीय पी.एस.बरार, तांत्रिक कमिटीचे प्रमुख पाल, ख़्वाजा अहमद आणि ऑर्गनायझिंग सेक्रेटरी इलय राजा यांनी मुंबई संघाच्या खेळाडूंचे विशेष कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी मुंबई डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद प्रभू, ऐश्वर्याताई शेटे आणि सचिव जगदीश अंचन यांनी ही संघाच्या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या उल्लेखनीय यशामुळे मुंबई डॉजबॉल संघाने राष्ट्रीय पातळीवर आपली भक्कम ओळख निर्माण केली असून,महाराष्ट्रातील डॉजबॉल खेळाच्या उज्ज्वल भविष्यासाठी हे यश अत्यंत प्रेरणादायी ठरणार आहे.

**मुंबई मुले संघ :-** मनीष विश्वकर्मा (कर्णधार), ललित नवाली, प्रणित पाटील, उज्ज्वल त्रिपाठी, कृष्णा कोंडल, रुद्र शिंदे, राज बदी, समर्थ कदम, तन्मय विनेरकर, श्रीश नायर, आयुष कुमार सिंह, नरेश राऊत.

**मुंबई मुली संघ :-** तानिया ठाकूर (कर्णधार), सानिका पाटील, चैत्रवी तावडे, हेमाक्षी बामणे, अन्वी बुरीच्या, प्रलक्ष मोहरे, सर्वांगी पाट्याने, ग्रंथा देसाई, गार्गी घाडगे.

# थोडक्यात

## ढगाळ हवामानामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव

### वातावरणातील बदलांमुळे शेतकरी वर्ग धास्तावला



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या आकाशातील ढगाळ व दमट हवामानामुळे रब्बी हंगामातील पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव वाढू लागला असून कांदा आणि गहू उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत. महिनाभरापासून सुर्यप्रकाश कमी प्रमाणात पडत असल्याने व वातावरणातील आर्द्रता वाढल्याने रब्बीचे पीक वाचविण्यासाठी शेतकरी पिकांना रासायनिक औषधांचा डोस देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. खरिपानंतर मोठ्या प्रमाणात कांदा, गहू, हरबरा या रब्बी पिकांची लागवड केली जाते. यावर्षी पावसाचे प्रमाण समाधानकारक झाल्याने जमिनीत ओलावा टिकून होता. मागणी आडीच महिन्यांपासून थंडी चांगली असल्याने पिंकांची वाढ समाधानकारक होत होती. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. मात्र, गेल्या पंधरा दिवसांपासून हवामानात अचानक बदल होवून ढगाळ वातावरण तयार झाल्याने परिस्थिती बदलली आहे. रब्बी हंगामात दूषित हवामानाशी दोनहात करीत पिकांचे उत्पादन काढण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढावली आहे; मात्र अशा विपरीत परिस्थितीने बळीराजाचे शेतीविषयक आर्थिक बजेट पूर्ण कोलमडून शेतकरी चिंतातूर होऊ लागला आहे. रब्बी हंगामातील कांदा पिकावर लागवडीपासून आजपर्यंत दोन ते तीन वेळा रासायनिक औषधांची फवारणी शेतकजयांनी केली आहे. तरीसुद्धा कांद्यावरील रोगराईचे सावट काही केल्या दूर होत नसल्याची सत्यस्थिती समोर येत आहे. पर्यायी पिकांवर चौथ्यांदा फवारणीचा फेरा शेतकऱ्यांनी सुरू केला आहे.

पारनेर तालुक्याच्या पश्चिम भागात मुबलक पाणी उपलब्ध होत असल्याने खरीप व रब्बीच्या मुख्य दोन हंगामात विविध पिकांचे उत्पादन घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. विशेषत: या हंगामात कांदा, ज्वारी, मका, फूलझाडे, पालेभाज्या व फळपिकांकडे शेतकरी अधिक आकर्षित झालेला असून, या पिकांव्यातिरिक्त कोबी, फ्लॉवर, मका, पालेभाज्या, वेलवर्गीय व तोडीव पिकांची शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लागवड केलेली आहे. मात्र बहुतांशी सर्वच पिकांना लहरी हवामानाचा मोठा फटका सहन करावा लागत आहे. विविध रोगांचा प्रादुर्भाव पिकांवर झाल्याने पिके खराब होऊन वाढ खुंटली आहे. दमट वातावरणामुळे पिकांवर करपा,मावा व पीळ रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. यामुळे शेतकरी वर्ग झळ सोसून महागडी रासायनिक औषधांची फवारणी करतानाचे चित्र सर्वत्र सध्या दिसत आहेत.

## जनगणना २०२७ विषयी पहिले प्रशिक्षण सत्र नवी मुंबईत उत्साहात संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** जनगणना कार्य निर्देशालय महाराष्ट्र यांच्या वतीने जनगणना २०२७ विषयक कार्यवाही सुरु होणार असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेचे चार्ज अधिकारी व जनगणनेशी संबधीत अधिकारी यांचा पहिल्या टप्प्यातील प्रशिक्षण कार्यक्रम महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात संपन्न झाला. याप्रसंगी सहा.संचालक जनगणना अनुमोल एम. आणि सांख्यिकी अधिकारी रुचिता तेलंग यांनी जनगणना कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली.

नवी मुंबई महानगरपालिकेचे परिमंडळ २ उपआयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी संजय शिंदे तसेच परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे यांनी उपस्थित प्रशिक्षकांचे महानगरपालिकेच्या वतीने स्वागत केले.

# विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारावा - छाया साळवे

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०३, मुंबई :** शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेला बळी न पडता वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासावा आणि आपली बौद्धिक,मानसिक व शैक्षणिक प्रगती करावी.असे आवाहन बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या उपशिक्षणाधिकारी छाया साळवे (म.ख.खा.) यांनी केले. त्या आज ना.म.जोशी मार्ग मनपा शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या विभागीय शालेय विद्यार्थी विज्ञान प्रदर्शनात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी या विज्ञान प्रदर्शनासाठी नवनिर्वाचित नगरसेविका अबोली गोपाळ खाड्ये यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या सोबत जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी (शाळा) वर्षा गांगुर्डे यांची ही विशेष उपस्थिती होती. मंगळवार, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी जी/ दक्षिण विभागातील उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी हे एकदिवशीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

या विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर, आकर्षक व वास्तववादी प्रयोग मांडले होते. शालेय अभ्यासक्रमातील गणित पेटी ते आधुनिक शेतीचे औजारे, सौर ऊर्जा प्रकल्प, रस्त्यावरील उघड्यावर बनवलेले खाद्य पदार्थ, जंक फूड यापासून होणारे शारीरिक दुष्परिणाम, रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रोजेक्ट अशा वेगवेगळ्या विषयाच्या प्रयोगाने येणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकांचे व मान्यवरांची मने जिंकली.प्रत्येक शाळेचा एक शिक्षक आणि प्रयोगाचे सादरीकरण करणारे विद्यार्थी विज्ञान प्रयोगबद्दल भरभरून बोलत होते.या विद्यार्थ्यांच्या कला आणि सादरीकरण एवढं अप्रतिम आणि उत्तम होतं की प्रदर्शनाला आवर्जून उपस्थित झालेले सर्व मान्यवर भारावून गेले.

जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनी यावेळी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.त्या म्हणाल्या की मुंबई महानगर पालिकेचे विद्यार्थी सर्वगुण संपन्न असले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी कला,क्रीडा यांच्या सहभागा बरोबरच इतर क्षेत्रातील शैक्षणिक उपक्रमामध्येही हिरीरीने सहभागी होऊन आपले व आपल्या शाळेचे नाव उज्वल करावे.

ना.म.जोशी मार्ग मराठी शाळेच्या इन्चार्ज



शिक्षिका सुमित्रा यमगेकर यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली. यावेळी जी दक्षिण विभागाच्या विभाग निरीक्षक पूनम शिंदे व सेवानिवृत्त प्रशि.सुभाष यादव यादव यांनी या प्रदर्शनाचे परीक्षण केले. वरळी सी फेस इंग्रजी शाळेच्या विज्ञान प्रयोगाचा प्रथम क्रमांक,तर ना म जोशी मार्ग शाळा, सीताराम मील शाळा व आदर्श नगर शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केलेल्या प्रयोगाना द्वितीय,तृतीय व उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर केले.हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी विभागातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व इन्चार्ज शिक्षक, प्रशिक्षित शिक्षक यांनी सहकार्य केले.

# बोंडारवाडी धरणाचा मुद्दा निवडणूक प्रचारात गाजतोय

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०३, मेढा (सातारा) :** जावली पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. या रणधुमाळीत व निवडणूक प्रचारात बोंडारवाडी धरणाचा मुद्दा गाजत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सातारा जिल्ह्याचे सुपूत्र महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांची नुकतीच प्रचार सभा केळघर या ठिकाणी पार पडली.

या सभेदरम्यान ना. एकनाथ शिंदे यांनी बोंडारवाडी धरण कोणत्याही परिस्थितीत निर्माण केले जाणार,याला कोणीही अडथळा आणू शकत नाही असे ठामपणे सांगितले.सातारा जावली विधानसभेचे आमदार ,महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनीही केडंबे येथील प्रचार सभेत बोंडारवाडी धरणाचे स्वप्न राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच पुर्ण करतील असा विश्वास व्यक्त केला व लोकप्रतिनिधी म्हणून मी कायम बोंडारवाडी




धरण निर्माणासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

बोंडारवाडी धरण बांधण्यासाठी एका तपाहून अधिक काळ लोटला, बोंडारवाडी धरणाचे स्वप्न ज्यांनी उराशी बाळगून आपल्या पुर्ण हयातीत नेटाने लढा दिला त्या दिवंगत विजयराव मोकाशी यांनी अगदी शेवटच्या क्षणीही एकच इच्छा बोंडारवाडी धरण हे बोलून त्यांची प्राणज्योत मालवली.

स्वर्गीय विजयराव मोकाशी यांना जाऊन तीन वर्षे झाली तरीही धरणाच्या कामाला मुर्त स्वरूप येत नाही आणि हा मुद्दा राज्यात सत्ताधारी असलेल्या दोन्ही प्रमुख पक्षांकडून मात्र पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणूक प्रचारात राजकारणाचा मुद्दा केला जातोय ही शोकांतिका असल्याची भावना जनमानसात आहे.

बोंडारवाडी धरण हा केवळ निवडणुकीतील मुद्दा नसून जावली तालुक्याच्या विकासाचा आणि शेती, पिण्याचा पाण्याचा भविष्यासाठीचा महत्वाचा प्रकल्प आहे. मात्र अनेक वर्षे लोटूनही प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. आता तरी शासनाने ठोस निर्णय घेऊन धरणाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवावे, अशी मागणी या निमित्ताने जनतेतून होत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील सौंदाळा ग्रामपंचायतचा ऐतिहासिक निर्णय

## दररोज गावासाठी राष्ट्रगीत लागणार; शिवी दिल्यास ५०० रु. दंड करणारी भारतातील पहिली ग्रामपंचायत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सौंदाळा ग्रामपंचायतने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या गावात सकाळी १० वाजता लाऊडस्पीकरवर राष्ट्रगीत लावण्यात येत आहे. गावातील सर्व नागरिकांना राष्ट्रगीताच्या वेळी उभं राहून देशाचा सन्मान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या निर्णयानुसार,नागरिक देखील या आदेशाचे पालन करताना पाहायला मिळत आहे.

सौंदाळा गाव हे नेहमीच समाज हिताचे अभिनव उपक्रम राबवते. शिवी दिल्यास ५०० रु दंड करणारी भारतातील पहिली ग्रामपंचायत तसेच विधवा सन्म ानासाठी विविध निर्णय अशा उपक्रम ाने सौंदाळा ग्रामपंचायत प्रसिद्धीच्या




झोतात आली आहे. यावेळी राष्ट्र प्रथम हा विचार प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजला पाहिजे, आपण या किंवा त्या जातीचे आहोत हे महत्वाचे नसुन भारत मातेचे सर्व सुपुत्र आहोत, ही भावना भारतीयांच्या मनामनात खोलवर रुजावी म्हणून गावात दररोज राष्ट्रगीत लावुन ग्रामस्थांना प्रेरित करणार असल्याचे लोकनियुक्त सरपंच शरदराव आरगडे यांनी सांगितले.

गावाने घेतलेल्या या निर्णयामुळे गावातील सर्वांच्या मनात देशप्रेम निर्माण होऊन दररोज देशाच्या प्रती सन्मान करण्याची संधी निर्माण होईल आणि लहान मुलांना देखील एक देश प्रेमाचे संस्कार होतील. देशाची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी हा निर्णय महत्वपूर्ण ठरेल, असे ग्रामपंचायतच्या सरपंच, उपसरपंच व सदस्यांनी सांगितले आहे.

या उपक्रमामुळे गावातील सामाजिक आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा आहे. गावातील शाळांमध्येही राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहून सन्मान करण्याचे आवाहन शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केले आहे. या निर्णयाचे गावातील नागरिकांनी स्वागत केले असून, हा निर्णय देशाच्या भवितव्यासाठी महत्वपूर्ण ठरेल, असे मत व्यक्त केले आहे. या उपक्रमामुळे देशातील जातीयवाद संपून देश अखंड राहील आणि सर्व नागरिकांमध्ये एकता आणि समरसता निर्माण होईल, असे ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या निर्णयाला गावातील विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक संस्थांनी समर्थन दर्शविले आहे.

# राहुरीत प्रथमच ज्युनियर महाराष्ट्र श्री बॉडी बिल्डिंग स्पर्धा उत्साहात

## ठाण्याच्या कु.अजय सकपाळ यांचा 'ज्युनियर महाराष्ट्र श्री २०२६' किताब

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०३, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी येथील प्रसिद्ध रणसिंग जिम यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ज्युनियर महाराष्ट्र श्री बॉडीबिल्डिंग स्पर्धा २०२६ मोठ्या उत्साहात पार पडली. ही स्पर्धा म हाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन व अहिल्यानगर जिल्हा बॉडीबिल्डिंग असोसिएशन यांच्या संलग्नतेने अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच घेण्यात आली. या स्पर्धेत ठाण्याच्या कु. अजय सकपाळ याने उत्कृष्ट शरीरयष्टी व सादरीकरणाच्या जोरावर 'ज्युनियर म हाराष्ट्र श्री २०२६' हा मानाचा किताब पटकावला. धुळे येथील पंकज कुंभार याने उपविजेतेपद मिळवले, तर कोल्हापूरच्या प्रथमेश नेमीटे याने बेस्ट पोजर हा पुरस्कार पटकावला.

विविध वजनगटांमध्ये झालेल्या स्पर्धेत ५५ किलो गटात अजय सकपाळ (ठाणे) प्रथम, समीर साठे (पुणे) द्वितीय, आयुष्य रोही (कोल्हापूर) तृतीय, साहिल वैद्य (मुंबई) चतुर्थ तर अशितोष राजघर (मुंबई) पाचवा ठरला.

६० किलो गटात प्रताप ठाकूर (सातारा) प्रथम, तुषार टोले (कोल्हापूर) द्वितीय, ऋषिकेश धुमाळ (ठाणे) तृतीय, रेहान बेपारी (सांगली) चतुर्थ व सुमित परब (पालघर) पाचवा आला. ६५ किलो गटात प्रथमेश नेमीटे (कोल्हापूर) प्रथम, प्रशांत धोत्रे




(अहिल्यानगर) द्वितीय, अभिषेक वेनुले (नाशिक) तृतीय, अर्जुन पलांडे (मुंबई) चतुर्थ व ओम कदम (ठाणे) पाचवा ठरला.

७० किलो गटात पंकज कुंभार (धुळे) प्रथम, शुभम मिसाळ (पुणे) द्वितीय, साईनाथ कोलते (छत्रपती संभाजीनगर) तृतीय, सूरज शेहेरसिंह (मुंबई) चतुर्थ व दादा म्हात्रे (ठाणे) पाचवा आला.

७५ किलो गटात धीरज लोकवानी (ठाणे) प्रथम, अफान शेख (सातारा) द्वितीय, यश लडखत (पुणे) तृतीय, धीरज बाळकुंडे (लातूर) चतुर्थ तर राज मडके (छत्रपती संभाजीनगर) पाचवा ठरला.

७५ किलोपेक्षा अधिक गटात मेहपूज शेख (अहिल्यानगर) प्रथम, अर्णव जगताप (ठाणे) द्वितीय, सुदर्शन महाजन (सांगली) तृतीय, पार्थ जाधव (कोल्हापूर) चतुर्थ तर रियॉन कोळी (मुंबई) पाचवा आला.मास्टर (४० वर्षांवरील) गटात मनोज माळी (नवी मुंबई) प्रथम, अविनाश राजपूत (मुंबई) द्वितीय, इब्राहिम बेग (नवी मुंबई) तृतीय, राहुल कांबळे (सांगली) चतुर्थ तर प्रकाश मोरे (ठाणे) पाचवा ठरला.

तसेच दिव्यांग बॉडी बिल्डिंग स्पर्धेत प्रथमेश भोसले प्रथम, पारस सुरडकर द्वितीय, हर्षवर्धन वहिले तृतीय, प्रतीक मोहिते चतुर्थ व युवराज राठोड पाचवा ठरला.या स्पर्धेचे यशस्वी आयोजन अहिल्यानगर जिल्हा बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे सचिव कैलास रणसिंग व अध्यक्ष मयूर दरंदले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यामध्ये सतीश रासकर, प्रतीक पाटील, डेव्हिड म कासरे, सौरभ बल्लाळ, राहुल कुलकर्णी, शुभम चौहान, राहुल पैलवान, भीमा चव्हाण, सद्दाम शेख, किरण पोटे, बबलू कटके आदींनी अथक परिश्रम घेतले. स्पर्धेसाठी महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या पंचमंडळातील संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा प्रतिनिधींनी पंच म्हणून काम पाहिले. या स्पर्धेमुळे राहुरी व अहिल्यानगर जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान मिळाले असून भविष्यात अशा स्पर्धांना अधिक चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# स्व.अजितदादांची नगर जिल्ह्यावर विशेष मेहेर नजर होती - पालकमंत्री विखे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांच्या कार्यकर्तृत्वाचा पूर्ण राज्यावर ठसा उमटला आहे. त्यांच्या निधनाच्या धक्क्यातून अजूनही राज्य सावरलेला नाही. त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपला कामाचा ठसा उमटवत उत्कृष्ट काम केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर ही त्यांच्या कामाचा प्रभाव होता. प्रत्येकाला त्यांनी सहकार्यच केले. स्व.अजितदादांनी मांडलेल्या चांदा ते बांधा या संकल्पनेतून त्यांची पूर्ण राज्यात वेगळी ओळख निर्माण झाली.

आपल्या अहिल्यानगर जिल्ह्यावर ही त्यांची विशेष मेहेर नजर होती. अशा कर्तृत्व संपन्न, नि:स्वार्थपणे मैत्री जपणारा, सुख दुखांच्या प्रसंगांना सर्वांना बरोबर घेणारा नेता आज आपल्यातून गेला आहे, अशा भावना जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनीव्यक्त करतस्व. अजितदादांना श्रद्धांजली वाहिली.



राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन येथील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात करण्यात आले होते. नगर शहरासह जिल्ह्यातील सर्व क्षेत्रातील व्यक्तींनी या शोकसभेस उपस्थिती लावून स्व.अजितदादांच्या स्मृती जाग्या करत भाउक होत भावना व्यक्त केल्या. त्यांच्या निधनाने राज्यात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याच्या भावना यावेळी उपस्थित बहुतांशांनी व्यक्त केल्या. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार संग्राम जगताप, आ.मोनिका राजळे, आ. काशिनाथ दाते, आ.हेमंत ओगले, आ.विठ्ठल लंघे, आ.आशुतोष काळे, आ.किरण लहामटे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले, उपाध्यक्ष माधवराव कानवडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळम कर, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे आदिंसह सर्व पक्ष, संघटना व संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री विखे म्हणाले, राज्यात जनतेच्या मनातील सरकार आल्यावर झालेल्या राजकीय घडामोडींनंतर अजितदादांनी सत्तेत जाण्याचा निर्णय घेत महायुतीत सहभागी झाले. कौटुंबिक विषयाबाबत त्यांना म ोठी किंमत मोजावी लागली. पण त्यांनी परिणामांचा विचार केला नाही. लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पत्नीच्या पराभवानंतर ही ते खचले नाहीत. तर नव्या हिंमतीने उभे राहून विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाची वेगळी प्रतिमा त्यांनी राज्यात निम ाण केली. आमच्यात पुष्कळशा कटूता व संघर्ष राहिला आहे. पण एकदा मैत्री जमली की सर्व काही होते. केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात त्यांनी आमच्या परिवाराबाबत कायम स्मरणात राहील अशी भूमिका त्यांनी मांडली.

# मुंबईत १७ मार्च रोजी पेंशन अदालत

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, मुंबई :** मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबईद्वारे टपाल विभागाच्या निवृत्तिवेतनधारकांसाठी / कुटुंब निवृत्तवेतन धारकांसाठी ५८ वी पेंशन अदालत १७ मार्च रोजी ११.३० वाजता मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई येथे आयोजित केली आहे. निवृत्तिवेतनधारकांच्या लाभाशी संबंधित तक्रारी, जे टपाल विभागातून निवृत्त झाले आहेत / ज्यांचा सेवेत असताना मृत्यु झालेला आहे. टपाल विभाग, महाराष्ट्र आणि गोवा राज्यांचे निवृत्तिवेतनधारक ज्यांचे ३ महिन्यांच्या आत पूर्तता झालेली नाही अशा प्रकरणांचा डाक पेंशन अदालत मध्ये विचार केला जाईल. पेंशन अदालतमध्ये पूर्णपणे कायदेशीर मुद्यांसह प्रकरणे जसे की वारसा प्रमाणपत्र, वेतनश्रेणी वाढविणे आणि धोरणात्मक बाबींसह शिस्तभंगाच्या आणि डी.पी.सी. च्या पुनरावलोकनासाठी प्रलंबित प्रकरणांचा विचार केला जाणार नाही. पेन्शनधारकांनी आपली तक्रार वैयक्तिकरित्या (एकत्रित स्वरूपात किंवा इतरांच्या वतीने नाही) संलग्न नमुन्यात तीन प्रतीमध्ये वरिष्ठ लेखाधिकारी/ सचिव, पेन्शन अदालत, मुख्य पोस्टमास्तर जनरल यांचे कार्यालय, महाराष्ट्र सर्कल, मुंबई जी.पी.ओ. इमारत, १ ला मजला, मुंबई ४०००01 येथे पाठवावी किंवा ई-मेलद्वारेरलर्ली.ाहळपवळर्रीीं.सीं.ळपया पत्त्यावर १६ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावी. १६ फेब्रुवारी २०२६ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाणार नाही.

# थोडक्यात

## चंद्रपूर मनपाच्या भारतीय जनता पार्टीच्या गटनेतेपदी शेखर शेट्टी यांची निवड

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०३, चंद्रपूर :** भारतीय जनता पार्टीच्या वतीने २४ नगरसेवकांच्या अधिकृत गटाची स्थापना करण्यात आली असून शेखर शेट्टी यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपूर येथील विभागीय कार्यालयात भाजपचे २३ आणि मित्रपक्षाचा १ असे एकूण २४ नगरसेवकांच्या गटाची अधिकृत स्थापना करण्यात आली. गटनेतेपदी इंडस्ट्रियल प्रभागातून विजयी झालेले शेखर शेट्टी यांच्या नावाची शिफारस करण्यात आली होती. या नावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच प्रदेश नेतृत्वाने सहमती दर्शवत शेखर शेट्टी यांच्या गटनेतेपदाची अधिकृत घोषणा केली. दरम्यान, दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व २४ नगरसेवकांनी नागपूर विभागीय कार्यालयात उपस्थित राहून भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत गटाची स्थापना केली.

## जनगणनेच्या सूचीत ओबीसी नाहीच!

### भारत सरकारच्या राजपत्रात स्पष्ट उल्लेख करा - सचिन राजुरकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.०३, चंद्रपूर :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसोबतच ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे केंद्र सरकारने जाहीर केले. यासंदर्भात २२ जानेवारीला राजपत्र जारी करीत जनगणनेसंबंधी ३३ सूची जाहीर करण्यात आल्या. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचा स्पष्ट उल्लेख करतानाच इतरांसाठी अन्य शब्दाचा वापर करण्यात आला. मात्र ओबीसींचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आल्याने जातनिहाय जनगणनेवरून संभ्रम निर्माण झाला आहे. केंद्र सरकारने ओबीसी समाजासोबत दगाबाजी केल्याचा आरोप राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सचिन राजुरकर यांनी केला आहे. जातनिहाय जनगणना करण्यासाठी सोमवार, दि.०२ फेब्रुवारी २०२६ ला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांना निवेदन देण्यात आले.

देशभरात जातनिहाय जनगणना केली जावी, अशी मागणी विरोधकांकडून केली जात होती. संसदेतील विरोधी पक्षनेते यांनी सुद्धा मुद्दा लावून धरला होता. देशाच्या विकासात कुणाचे किती योगदान आहे हे जाणून घेण्यासाठी कुणाची संख्या किती आहे ते समोर यावे, अशी भूमिका त्यांनी अनेकदा मांडली होती.यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ३० मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. केंद्रीय रेल्वे तथा माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ही माहिती दिली होती. ऑक्टोबर २०२६ पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तर उर्वरित भागात मार्च २०२७ पासून जनगणना सुरू करण्यात येणार असल्याचे १६ जून २०२५ ला स्पष्ट करण्यात आले होते. नंतर रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांनी जनगणनेसंबंधी अधिसूचना काढली होती. ७ जानेवारीला जनगणनेसंबंधात राजपत्र जारी केले गेले. २२ जानेवारीला जनगणना करण्यासाठी ३३ सूची तयार करून राजपत्रात समाविष्ट करण्यात आल्या. या सूचींमध्ये घर क्रमांक, जनगणना घर क्रमांक, सामग्री, घराची स्थिती, कुटुंब क्रमांक, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, त्याचे लिंग, विवाहित दाम्पत्यांची संख्या, घरातील खोल्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्रोत, पेयजलाची उपलब्धता, वीज, शौचालय, रेडिओ, टीव्ही, इंटरनेट, लॅपटॉप किंवा कम्प्युटर, मोबाइल, कार, मुख्य धान्य अशा विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. राजपत्रातील बाराव्या सूचीत अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करताना इतरांसाठी अन्य शब्द वापरण्यात आला आहे. ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख कुठेही करण्यात आला नाही आहे. निवेदन देते वेळी ओबीसी योद्धा रवींद्र टोंगे , गणेश आवारी, बबनराव राजुरकर, सुधाकर काकडे, राजू चौधरी, अतुल देऊळकर, दिनेश भोंगळे, शाम राजुरकर, शंकर पाल, आसाराम राघोर्ते, प्रेमा जोगी, किशोर जेणेकर, भाऊराव बोढाले, रंगराव पवार, चंदू माथने, चंद्रशेखर देवलकर, गौरव देवाळकर, वैभव शिरसागर, नवनाथ दरेकर, विपीन देवलकर, विठ्ठल पिंपळकर, सूरज देवाळकर, हर्षल टोंगे, रवींद्र देशमुख उपस्थित होते.

## के.रामलू प्रतिष्ठानचा 'आनंदाचा पासवर्ड' उपक्रम ठरला प्रेरणादायी

**अक्षराज : दत्त हमंद**



**दि.०२, कुंडलवाडी (नांदेड) :** 'जे पेरतो तेच उगवते' या उक्तीप्रमाणे पालकांनी आपल्या मुलांशी वागताना स्वतः आदर्श आई-वडील म्हणून वागणे अत्यंत गरजेचे आहे. पालकांचे वर्तनच मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करत असते. त्यामुळे मुलांशी मनमोकळेपणाने संवाद साधावा व त्यांना समजून घ्यावे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा.गणेश शिंदे यांनी केले. कुंडलवाडी येथील के.रामलू प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'आनंदाचा पासवर्ड' या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन शहरातील शिवम मंगल कार्यालयात दिनांक ०२ फेब्रीवरी २०२६ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.गणेश शिंदे यांच्यासह मनोविकार तज्ज्ञ डॉ.रोहित ठक्करवार, डॉ.उमेश आत्राम, साईनाथ उत्तरवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, मीना काकाणी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. गणेश शिंदे यांनी सांगितले की, पालकांनी मुलांच्या शैक्षणिक करिअरविषयी त्यांच्यावर अनावश्यक दबाव टाकू नये. त्याऐवजी त्यांच्या आवडीनिवडी समजून घेत संवादातून मार्गदर्शन करावे. घरातील वातावरण, पालकांचे वर्तन आणि मूल्ये याच गोष्टी विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर खोल परिणाम करतात. त्यामुळे पालकांनी प्रथम स्वतः आदर्श निर्माण करावा, असे त्यांनी ठामपणे सांगितले.तसेच, मुलांचे कौतुक चारचौघात करावे आणि चुका असतील तर त्या एकांतात समजावून सांगाव्यात असा मोलाचा सल्लाही त्यांनी पालकांना दिला. पुढे विद्यार्थ्यांना संबोधताना त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी मनातील न्यूनगंड दूर करून विविध क्षेत्रांत करिअरच्या संधी शोधाव्यात. गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करून उत्तम व्यक्तिमत्त्व घडवावे आणि आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यावा. यावेळी डॉ.रोहित ठक्करवार व डॉ.उमेश आत्राम यांनी मानसिक स्वास्थ्य या महत्त्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन करत पालक व विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागृती निर्माण केली. या कार्यक्रमाला शहरातील सर्व नगरसेवक, शालेय विद्यार्थी, पालक तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.नरेश बोधनकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पारंपरिक पसायदानाने करण्यात आली. या उपक्रमाबद्दल नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार तसेच के.रामलू प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून, हा कार्यक्रम पालक व विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.